# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२०४ दिनांक-२८/०५/२०२४

## मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीत यांना अटक करुन ०६ गुन्हे उघड करण्यास नायगाव गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश.

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १०/०५/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजता दरम्यान साधना हॉटेल, भारती पेट्रोलपंप, चिंचोटी ब्रिजजवळ, नायगाव पुर्व ता.वसई जि.पालघर येथे उभ्या असलेल्या फिर्यादी यांच्या टेम्पो मधील कॅबीन मध्ये दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीकडील मोबाईल जबरीने हिसकाऊन घेऊन चोरला. तसेच सदर चोरी केलेल्या मोबाईलचा व मोबाइल मधीन गुगल पे चा पासवर्ड अप्रामाणीकपणे वापरुन फिर्यादी यांचे कोटक महिन्द्रा बॅक अकांऊट नंबर ८६४६२७१०३५ मधील रक्कमे पैकी दिनांक ११/०५/२०२४ रोजी ५,०००/ रुपये, दिनांक १२/०५/२०२४ रोजी २५,०००, ५०,००० व २५,००० रुपये व दिनांक १४/०५/२०२४ रोजी २,४३० रुपये असे एकुण १,०७,४३०/- रु. फिर्यादी यांचे संमती शिवाय ट्रान्सफर करुन रोख रक्कम काढुन घेतल्याबाबत फिर्यादी यांनी नायगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरुन नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. I २९१/२०२४ भा.द.वि.स. कलम ३९२,३४ सह आय.टी.ॲक्ट ६६ (सी) प्रमाणे गुन्हा दाखल होता.

नायगाव पोलीस ठाण्यात मोबाईल चोरी प्रमाण जास्त प्रमाणात वाढल्याने मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेच्या अनुषंगाने नायगाव पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटिकरण शाखेच्या वेगवेगळया टीम बनवुन सदर काळात पोलीस ठाणे अभिलेखावरील दाखल गुन्हयाच्या तपासाचे अनुषगांने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण तसेच गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे १) **रुपेश इंद्रजित यादव, रा. कामन, ता. वसई जि. पालघर,** २) **अर्जुन विरेंद्र यादव, रा. कामन, ता. वसई जि. पालघर,** ३) **मोहम्मद हसन जुनेद शेख रा. चिचोंटी, ता. वसई जि.पालघर** व ४) **बशीर आलमगीर शेख रा.चिचोंटी, ता. वसई जि.पालघर** यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने कौशल्यपणे चोकशी केली असता त्यांनी खालील गुन्हयाची कबुली दिल्याने त्यास अटक करण्यात आली असुन गुन्हयातील चोरीस गेलेले मोबाईल, रोख रक्कम व इतर मुद्देमाल तसेच गुन्हा करीत असताना वापरलेले वाहन असा **एकुण १,६४,०००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील ०६ गुन्हे उघडकिस करण्यात यश आले आहे.

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | नायगाव | I २९१/२०२४ भादविस कलम ३९२, ३४ सह आय.टी.ॲक्ट ६६ (सी) प्रमाणे. |
| २. | नायगाव | I २६९/२०२४ भादविस कलम ३८० प्रमाणे |
| ३. | नायगाव | I २७०/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | नायगाव | I २७४/२०२४ भादविस कलम ३८० प्रमाणे |
| ५. | नायगाव | I २७६/२०२४ भादविस कलम ३८० प्रमाणे |
| ६. | नायगाव | I २८३/२०२४ भादविस कलम ३८० प्रमाणे |

- **आरोपीत नामे बशीर आलमगीर शेख यांच्याविरुध्द मुंबई शहर पोलीस आयुक्तालय येथे ०४ व नायगाव पोलीस ठाणे ०३ असे यापुर्वी गुन्हे दाखल आहेत.**
- **आरोपीत नामे रुपेश इंद्रजित यादव यांच्याविरुध्द यापुर्वी नायगाव पोलीस ठाणे ०५ येथे जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत.**

सदरची कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, सपोनि/रोशन देवरे, सपोनि/गणेश केकान, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खंताळ, जयवंत खंडवी,अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील, मसुब/सिध्देश्वर श्रीरसागर तसेच पोशि/अमोल बरडे नेमणुक- मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ वसई यांचे कार्यालय यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

